# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि 485 /2020 दिनांक: 06/06/2020

प्रति,

**सुधिर ठाकरे,**
**प्रकल्प प्रबंधक Ceinsys Tech Ltd.**
**१०/५ आयटी पार्क, व्हीएनआयटी समोर,**
**अकोला**

विषय - **अकोला जिल्हयातील एमआयडीसी औद्योगीक क्षेत्रामध्ये ड्रोन सर्व्हेक्षण करण्याची परवानगी मिळण्याबाबत.**

संदर्भ -
1. आपत्ती व्यवस्थापन कायदा- 2005
2. साथरोग प्रतिबंधीत कायदा – 1897
3. महसून व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पूनर्वसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील लॉकडाऊन सूचना पत्र क्र. DMU/२०२०/CR-९२/DiSM-१ दिनांक 19.5.2020
4. या कार्यालयाचे आदेश दिनांक 30 मे 2020
5. आपले कार्यालयाचे पत्र दिनांक 30.5.2020
6. जनरल मॅनेजर(आयटी) एमआयडीसी, अंधेरी मुंबई यांचे पत्र दिनांक 30.5.2020

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपत्ती व्यवस्थापना कायदा 2005 तसेच साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 अन्वये अकोला जिल्हयाचे क्षेत्रातील कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता महाराष्ट्र शासनाने लॉकडाऊनच्या कालावधी दिनांक 30.6.2020 पर्यंत वाढविला असल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (1)(2)(3) अन्वये संपूर्ण अकोला शहरव जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागाकरिता संचारबंदीचा कालावधी हा दिनांक 1.6.2020 ते दिनांक 30.6.2020 चे अनुषंगाने संदर्भ क्र. 4 नुसार वाढविण्यात आला आहे.

संदर्भ क्र. 5 अन्वये आपण दिलेल्या पत्रात नमूद केले आहे की, महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ यांचेकडील पत्र क्र. No. MIDC/IFMS/HQ/IT Cell/२०१९/Do८६८३ , दि. 17/09/2019अन्वये आपणांस कार्यादेश प्राप्त झाले असुन त्या अनुषंगाने अकोला जिल्ह्यातील एमआयडीसी च्या भौगोलिक क्षेत्राचे ड्रोन सर्व्हेक्षण करावयाचे आहे. सदरचे क्षेत्र 260.54 हे. आर (2.6 Km. ) असुनसदरचे सर्व्हेक्षण हे दिनांक 1 जून 2020 ते 15 जूलै 2020 या कालावधीत करावयाचे आहे. त्याकरीता परवानगी मिळण्यांत यावी तसेच याच विषयाचे अनुषंगाने संदर्भिय क्र. 6 अन्वये जनरल मॅनेजर (आयटी) एमआयडीसी अंधेरी, मुंबईयांनी सुध्दा पत्र सादर केले आहे.

शासनाचे संदर्भिय क्र. 3 अन्वये दिलेल्या सुधारित मार्गदर्शक सुचनांनुसार महाराष्ट्र राज्य औद्योगिक महामंडळ (MIDC) क्षेत्रांमधील कामांना विशेष अटींच्या अधीन राहून सवलती देण्यांत आलेल्या आहेत. त्यामुळे M/s Ceinsys Tech Lt. Nagpur व M/s Symtronics Automation Private Ltd, Pune यांना अकोला जिल्ह्यातील एमआयडीसी औद्योगीक क्षेत्र 260.54 हे. आर (2.6 Km. )मध्ये ड्रोन सर्व्हेक्षण करण्याची परवानगी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून देण्यांत येत आहे.

**अटी व शर्ती**

१. सदरची परवानगी ही केवळ अकोला जिल्हयातील महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) क्षेत्राच्या कामाच्या ठिकाणाकरीता राहील.

..2..

२. संबंधीतांनी ड्रोन सर्व्हेक्षणाचे काम करतांना काम पुर्ण होईपर्यंत अकोला जिल्ह्यात वास्तव्य करणे अनिवार्य राहील.
३. संबंधीतांनी ड्रोन सर्व्हेक्षणाचे काम करण्याकरीता अकोला जिल्ह्यामध्ये आल्यानंतर संबंधीत उपविभागीय अधिकारी तसेच पोलीस विभागास कळविणे बंधनकारक राहील.
४. अकोला जिल्ह्यात प्रवेश करण्यापूर्वी संबंधीतांनी आपली वैद्यकिय तपासणी करावी व वैद्यकिय प्रमाणपत्र सोबत बाळगणे बंधनकारक राहील.
५. संबंधीतांनी अकोला जिल्ह्यातील स्थानिक लोकांच्या संपर्कात येवू नये सदरची परवानगी हि केवळ महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) क्षेत्रापुरती मर्यादित आहे त्यामुळे अकोला जिल्ह्याअंतर्गत इतरत्र फिरु नये.
६. ड्रोन सर्व्हेक्षणाचेकाम करतांना कुणालाही कोरोना सदृष्य लक्षणे आढळून आल्यास त्याबाबत तातडीने महसूल/आरोग्य विभाग यांचेशी संपर्क करुन संबंधीतांना तात्काळ उपचाराकरीता स्थानिक रुग्णालयात नेण्याची जबाबदारी ही आपली राहील याची नोंद घ्यावी. तद्नंतर Home Quarantine राहणे बंधनकारक राहील.
७. संबंधितांनी आपल्या मोबाईलमध्ये आरोग्य सेतू ॲप डाऊनलोड करुन वापरणे बंधनकारक राहील.
८. ड्रोन सर्व्हेक्षणाचे काम करतांना स्वच्छता व सामाजिक अंतर (Social Distancing) चे सर्व नियम पाळण्यात यावे.
९. उपरोक्त प्रकल्पाकरीता ड्रोन सर्व्हेक्षणाचे काम करतांना संबंधितांना मास्क, हँडग्लोज, सॅनिटायझर व इतर प्रतिबंधात्मक साहित्य आपले स्तरावरुन उपलब्ध करुन देण्यांत यावे तसेच ड्रोन सर्व्हेक्षणाचे काम करतांना मास्क लावणे अनिवार्य राहील याची नोंद घ्यावी.
१०. या कार्यालयाच्या संचारबंदीच्या आदेशामध्ये नमुद केल्याप्रमाणे 5 किंवा त्यापेक्षा अधिक कर्मचारी / कामगार हे एकत्र येवून काम करणार नाही व कर्मचारी / कामगार घरी जातांना एकत्रित जाणार नाहीत याची दक्षता घेण्यांत यावी.
११. अकोला जिल्ह्याकरीता लागू करण्यांत आलेल्या संचारबंदीच्या आदेशातील नमुद सूचनांचा तसेच कायदा व सुव्यवस्थेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.
१२. सदर कामाची सुरुवात करतांना संबंधित पोलीस स्टेशन यांना सूचित करण्यांत यावे. तसेच सदर कामाकरीता पोलीस विभागाकडून स्वतंत्र परवानगी घेण्यात यावी.
१३. वरील नमुद अटींचा भंग केल्याचे आढळून आल्यास आपत्ती व्यवस्थापन कायदा-2005 चे कलम 51 ते 60, भारतीय साथरोग अधिनियम 1897, फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144, भारतीय दंड संहिता 1860 चे कलम 188 व इतर संबंधित कायदे व नियम अंतर्गत दंडात्मक, फौजदारी अथवा दोन्ही प्रकारची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(जितेंद्र पापळकर, भाप्रसे)
**जिल्हादंडाधिकारी अकोला**
जिल्हादंडाधिकारी, अकोला

**प्रतिलिपी –**

1. जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला
2. उपविभागीय अधिकारी, अकोला
3. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र राज्य औद्योगीक विकास महामंडळ अमरावती
4. व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य औद्योगीक विकास महामंडळ अकोला
5. जिल्हा शल्य चिकित्सक , अकोला

यांना माहिती व कार्यवाही करिता.

**जिल्हादंडाधिकारी अकोला**
जिल्हादंडाधिकारी, अकोला